# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२९४८/२०२१

**अपिलार्थी, श्री.नितीन म. राऊत**
**आराध्य, घर क्र.१०१, राम मंदिर आळी**
**वर्तक मार्ग, विरार (प)**
**ता.वसई, जि.पालघर ४०१ ३०३**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त
प्रभाग समिती बी, विरार पूर्व
प्रभाग समिती बी कार्यालय
वसई विरार शहर महानगरपालिका
ता.वसई, जि.पालघर ४०१ २०३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त
परिमंडळ क्र.१, वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्यालय, विरार पूर्व, जि.पालघर ४०१ ३०५

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १०.४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २.९.२०२१ | २१.९.२०२१ | ३०.९.२०२१ | —— |

अपिलार्थी यांनी दि.१९.११.२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" (मौजे विरार सर्वे नं.३३४, हिस्सा नं.१, अपिलार्थी श्री.दत्ता पाणथळे व इतर यांनी दाखल केलेल्या अपिल मेमो/अर्जाबाबत व इतर माहिती.) "

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती देता येणार नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दा | पुर्तता |
|---|---|---|
| १ | मौजे विरार, सर्वे नं.३३४, हिस्सा नं. १, अपिलार्थी श्री. दत्ता पाणथळे व इतर यांनी दाखल केलेल्या अपिल मेमो/अर्ज (Appeal Memo/Application) व त्याबरोबर जोडलेली सर्व कागदपत्रे (नमुने, पुरावे Exhibit No. १) | रे. मु. नं. ३४०/२०२१ सदर चा दावा वसई दिवाणी न्यायालय येथे सुनावणीसाठी प्रलंबित आहे. सबब माहिती अधिकार २००५, कलम ८ (१) (ब) (ग) अन्वये सदर ची माहिती देता येणे शक्य नाही. |
| २ | अपिलार्थी पालिका प्रशासनाला बजावलेली नोटीस | |
| ३ | पालिकेने मा. न्यायालयात सादर केलेले कॅव्हेट (caveat) | |
| ४ | पालिकेने मा. न्यायालयात सादर केलेली प्रमाणपत्रे व लेखी म्हणणे. (Affidavits and Written Say) | |
| ५ | मा. न्यायालयात सदर दाव्यात जारी केलेली स्थगिती आदेश (Status Quo Order) | |

प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"श्रीमती. धनश्री शिंदे जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, प्रभाग समिती (बी) यांनी माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकामाबाबतची न्यायालयीन माहिती अपिलार्थी यांना १५ दिवसांत देण्यात यावी."

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे, द्वितीय अपिलावर गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत माहिती मिळाली नाही असे त्यांनी सुनावणी दरम्यान सांगितले. प्रथम अपिलिय अधिकारी यांचेसमोर सुनावणी घेऊन दि.१३.१.२०२२ रोजी अनधिकृत बांधकामाबातची न्यायालयीन माहिती अपिलार्थी यांना १५ दिवसांत देण्यात यावी असे आदेश पारित केले होते. त्या आदेशाचेसुध्दा पालन झालेले नाही असेही अपिलार्थी यांनी कथन केले.

प्रथम अपिलिय अधिकारी यांचे आदेश असूनदेखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती पुरविली नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. सबब, प्रथम अपिलिय अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार संपूर्ण माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य पुरविणे उचित होईल.

अपिलार्थीस माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु. २५,०००/-) एवढी शास्ती का आकारण्यात येऊ नये याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी लेखी खुलासा सादर करणे उचित होईल.

जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतेही उत्तर आलेले नाही अथवा ते किंवा त्यांचे प्रतिनधी उपस्थित नाहीत. यास्तव प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणी आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, प्रभाग समिती (बी), विरार पूर्व, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी **अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

**२.** तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. धनश्री शिंदे, सहा. आयुक्त, प्रभाग समिती (बी), वसई विरार शहर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २.९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा **लेखी खुलासा त्यांनी दि.१३.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोगाकडे व्यक्तीश: सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

४. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० एप्रिल, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. धनश्री शिंदे, सहा.आयुक्त
प्रभाग समिती बी, विरार पूर्व, प्रभाग समिती बी कार्यालय
वसई विरार शहर महानगरपालिका, ता.वसई, जि.पालघर ४०१ २०३

**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती बी,
विरार पूर्व, प्रभाग समिती बी कार्यालय
वसई विरार शहर महानगरपालिका , ता.वसई, जि.पालघर ४०१ २०३ **यांचेमार्फत रवाना.**